# बुधवार

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवंचिता। नेणता भक्त मी तूझा। बुद्धि दे रघुनायका ।।1।। मन हे आवरेना कीं वासना वावरे सदा। कल्पना धांवते सैरा। बुद्धि दे.।।2।। अन्न नाहीं वस्त्र नाहीं सौख्य नाहीं जनांमधें। आश्रयो पाहतां नाहीं। बुद्धि दे.।।3।। बोलतां चालतां येना कार्यभाग कळेचिना। बहुत पीडलों लोकीं। बुद्धि दे.। तुझा मी टोणपा झालों कष्टलों बहुतापरी। सौख्य तों पाहतां नाहीं। बुद्धि दे.।।5।। नेटकें लिहितां येना वाचितां चुकतों सदा। अर्थ तो सांगतां येना। बुद्धि दे. ।।6।।

प्रसंग वेळ तर्केना सुचेना दीर्घ सूचना। पत्रिकी राखतां येना बुद्धि दे. । ।7 । । संसारी श्लाघ्यता नाहीं सर्वही लोक हांसती। विसरू पडतो पोटीं बुद्धि दे. । ।8 । । चित्त दुश्चित्त होतें हें ताळतंत्र कळेचिना। आळसू लागला पाठीं बुद्धि दे. । ।9 । । कळेना स्फूर्ति होईना आपदा लागली बहूं। प्रत्यहीं पोट सोडीना बुद्धि दे. । ।10 । । संसार नेटका नाहीं उद्वेग वाटतो जिवीं। परमार्थ आकळेना कीं बुद्धि दे. । ।11 । । देईना पुरविना कोण्ही उगेचि जन हांसती। लौकिक राखतां येना बुद्धि दे. । ।12 । । पिसुणे वाटती सर्वे

कोणीही मजला नसे। समर्था तूं दयासिंधु बुद्धि दे. ।।13।। उदास वाटतें जीवीं आतां जावें कुणीकडे। तूं भक्तवत्सला रामा बुद्धि दे.।।14।। कायावाचा मनोभावें तुझा मी म्हणवीतसें। हे लाज तुजला माझी बुद्धि दे.।।15।। सोडविल्या देवकोटी भूभार फेडिला बळे। भक्तांसी आश्रयो मोठा बुद्धि दें.।।16।। उदंड भक्त तुम्हाला आम्हांला कोण पूसतें। ब्रीद हें राखणें आधीं बुद्धि दे।।17।। उदंड ऐकिली कीर्ति पतितपावना प्रभो। मी एक रंक दुर्बुद्धी बुद्धि दे.।।18।। आशा हे लागली मोठी दयाळू बा कृपा करी। आणीक नलगे कांहीं बुद्धि दे.।।16।। रामदास म्हणे माझा संसार तुज लागला । संशयो वाटतो पोटी बुद्धि दे.।।20।।

जयजय रघुवीर समर्थ।।